# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.

## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- घनकचरा प्रकल्प अहवालानुसार मौजे काटई मल:निस्सारण केंद्र येथे १० टी.पी.डी. क्षमतेचा बायोगॅस प्लॅन्ट उभारणे बाबतच्या प्रस्तावाची ई-निविदा मागविणे कामी मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका परिक्षेत्रात निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे करीता १० टिपीडी क्षमतेचे ३ बायोगॅस प्लॅन्ट उभारणे कामी निर्देश प्राप्त झालेले आहेत. सदर कामी घनकचरा प्रकल्प अहवालामध्ये ₹५,००,८५,०००/- मात्रची तरतुद करण्यांत आलेली आहे.

सद्यस्थितीत चाविंद्रा येथील भिवंडी महानगरपालिकेच्या जागेत १० टिपीडी क्षमतेचा बायोगॅस प्लॅन्ट उभारणेसाठी REQUEST FOR PROPOSAL (R.F.P.) मागविण्यांत आले असता तीन निविदाकार प्राप्त झालेले असुन पुढील कार्यवाही सुरु आहे. तसेच मौजे काटई येथे १० टिपीडी क्षमतेचा बायोगॅस प्लॅन्ट उभारणे प्रस्तावित आहे.

घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवाला नुसार सदर नमुद कामांची पुर्तता विहित वेळेत करणेसाठी यापुर्वी शासन निर्देशानुसार घनकचरा प्रकल्प अहवालामधील कामे ही दि. ३१/०३/२०२३ अखेर पुर्ण करणे बाबत सुचविले आहे. त्याप्रमाणे मौजे काटई येथे १० टिपीडी क्षमतेचा बायोगॅस प्लॅन्ट उभारणेकामी व वार्षिक देखभाली करीता REQUEST FOR PROPOSAL (R.F.P.) मागविणे कामी प्रस्ताव तयार करण्यांत आलेला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १ | **घनकचरा प्रकल्प अहवालानुसार मौजे काटई मल:निस्सारण केंद्र येथे १० टी.पी.डी. क्षमतेचा बायोगॅस प्लॅन्ट उभारणे बाबतच्या प्रस्तावाची ई-निविदा मागविणे कामी मान्यता मिळणे बाबत.** |

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका मालकीचे मौजे काटई मल:निस्सारण केंद्र येथे १० टी.पी.डी. क्षमतेचा बायोगॅस प्लॅन्ट उभारणे बाबतच्या कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता व महा-ई-टेंडर पोर्टलवर प्रसिद्ध करणे कामी मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** १०२ **दिनांक :** २७ / ०२/ २०२३

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका मालकीचे मौजे काटई मल:निस्सारण केंद्र येथे १० टी.पी.डी. क्षमतेचा बायोगॅस प्लॅन्ट उभारणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. . एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका मालकीचे मौजे काटई मल:निस्सारण केंद्र येथे १० टी.पी.डी. क्षमतेचा बायोगॅस प्लॅन्ट उभारणे बाबतच्या कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता व महा-ई-टेंडर पोर्टलवर निविदा प्रसिद्ध करणेस मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- भिवंडी निजामपूर शहर महानरपालिका क्षेत्रात चाविंद्रा येथे १० मे.ट. क्षमतेचा बायोगॅस प्लॅन्ट उभारणे कामी R.F.P. मागविण्यांत आले असता प्राप्त दरांना मान्यता मिळणे बाबत.**

स्वच्छ भारत सर्वेक्षण अंतर्गत तसेच भिवंडी शहरातील तयार होणाऱ्या काही प्रमाणात कचऱ्यावर प्रक्रिया करुन बायोगॅस प्रकल्प उभारणे गरजेचे आहे. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रकल्प तयार केलेला असुन भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात चाविंद्रा येथे १० मे.ट. क्षमतेचा बायोगॅस प्लॅन्ट उभारणे कामी R.F.P. मागवुन एजन्सी नेमुन त्यांचे मार्फत BARC's NISARGRUNA Tecnology चा प्लॅन्ट उभारणे कामी प्रकल्प अहवाल तयार करणे व ५ वर्षा करीता वार्षिक निगा, दुरुस्ती व देखभाली करीता मा. महासभा ठराव क्र. ३३२, दि.१०/०५/२०२१ रोजी अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार चाविंद्रा या ठिकाणी १० मे.ट. क्षमतेचा BARC's NISARGRUNA TECHNOLOGY चा बायोगॅस प्लॅन्ट उभारणे कामी दै.वृत्तपत्रात तसचे महा-ई-टेंडर्स या संकेतस्थळावर प्रसिद्ध करुन ई-निविदा मागविण्यात आली असता एकुण तीन निविदा प्राप्त झालेल्या असुन त्यांचा तौलानिक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१. **मे. लाहस ग्रीन इंडिया प्रा. लि. - ₹ ४,९८,५०,०००/-**
२. मे. ऊर्जा बायो सिस्टम प्रा. लि. - ₹ ४,९९,७५,०००/-
३. मे. इरा हायड्रोबायोटेक एनर्जी प्रा. लि. - ₹ ५,००,५०,०००/-

उपरोक्त प्राप्त दरांपैकी मे. लाहस ग्रीन इंडीया प्रा. लि. यांचे सर्वांत कमी दर प्राप्त झालेले आहे. वाटाघाटी अंती त्यांनी खालील तक्त्यात नमुद केलेल्या दरांनी काम करण्याची लेखी संमती दर्शविली आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १. | प्रकल्प उभारणी (A) | २,३३,७३,७६५/- |
| २. | प्रकल्प परिचालन व देखभाल दुरुस्ती ५ वर्षाकरीता (B)<br>मुळ रक्कम ₹२६४७६२३५/- (१.५% कमी दराने) | २,६०,७९,०९१/- |
| | | |
| | एकुण (A+B) | ४,९४,५२,८५६/- |
| | (अक्षरी - चार कोटी चौऱ्याण्णव लाख बावन्न हजार आठशे छप्पन रुपये मात्र.) | |

सदर कामास मा. महासभेची मान्यता प्राप्त झालेली आहे. दरम्यानच्या कालावधी मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे.

शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात चाविंद्रा येथे १० मे.ट. क्षमतेचा बायोगॅस प्लॅन्ट उभारणे कामी R.F.P. मागवुन एजन्सी नेमुन त्यांचे मार्फत BARC's NISARGRUNA Tecnology चा प्लॅन्ट उभारणे कामी प्रकल्प अहवाल तयार करणे व ५ वर्षा करीता वार्षिक निगा, दुरुस्ती व देखभाल करणे बाबत कामाच्या **₹४,९४,५२,८५६**/- मात्रच्या निविदेच्या दरांना मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**ठराव क्रमांक :** १०३ **दिनांक :** २८ / ०२ / **२०२३**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात चाविंद्रा येथे १० मे.ट. क्षमतेचा बायोगॅस प्लॅन्ट उभारणे कामी R.F.P. मागवुन एजन्सी नेमुन त्यांचे मार्फत BARC's NISARGRUNA Tecnology चा प्लॅन्ट उभारणे कामी प्रकल्प अहवाल तयार करणे व ५ वर्षा करीता वार्षिक निगा, दुरुस्ती व देखभाली कामाच्या ₹४,९४,५२,८५६/- मात्रच्या निविदेच्या दरांना मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव, कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात चाविंद्रा येथे १० मे.ट. क्षमतेचा बायोगॅस प्लॅन्ट उभारणे कामी R.F.P. मागवुन एजन्सी नेमुन त्यांचे मार्फत BARC's NISARGRUNA Tecnology चा प्लॅन्ट उभारणे कामी प्रकल्प अहवाल तयार करणे व ५ वर्षा करीता वार्षिक निगा, दुरुस्ती व देखभाल करणे बाबत कामाच्या **₹४,९४,५२,८५६**/- मात्रच्या निविदेच्या दरांना मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**